REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविलास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ४ | पुणें, बुधवार, तारीख ८ जून, १९३८ | अंक २३

मिनर्व्हा, पुणें
स्टार्स–संमेलन

रत्नप्रभा
आशालता

शनिवार ता. ११ पासून सुरू होणार ?
ज्वाला
शनि. ता. ११ पासून सुरू होणार ?

चंद्रमोहन
विनायक

हंसचा मराठी बोलपट

दिग्दर्शक—विनायक
कथालेखक—वि. स. खांडेकर

पुण्यांत येणाऱ्या प्रवाशांसाठी भोजनाचें व उतरण्याचें निर्धास्त ठिकाण.
पूना गेस्ट हाऊस
टेलिफोन नं. ७७९ : लक्ष्मी रोड–गणपति चौक–पुणें.
हवेशीर जागा
सुग्रास भोजन
उत्तम आदरातिथ्य

फराडकर टेलर्स ॲकॅडिमी
( सिटी पोस्टासमोर पुणें २ )
येथें शिवणकलेचें शास्त्रीय व व्यावहारिक धंदेशिक्षण फीसुद्धां सर्व खर्च मिळून फक्त ११० रु. त पूर्ण खात्री होईपर्यंत मिळतें.

## विविध माहिती

**बँकांस सुट्टी**

गुरुवार, ता. ९ जून रोजीं राजाचे वाढदिवसानिमित्त व सोमवार, ता. १३ जून रोजीं झरथोस्तनो दिसोनिमित्त बँका बंद रहातील.

**ओरिएंटल विमा कं. लि.**

वरील कंपनीनें गेल्या वर्षी ९ कोटि, ९८ लक्ष रुपये किंमतीच्या ५५,२२८ विमा पॉलिसी दिल्या. हप्त्यांचें एकूण उत्पन्न ३ कोटि, २७ लक्ष रुपये झालें. विमा खातीं फंडांतील रकमेवर ४.५९% व्याज पडलें. कंपनीची साधारण सभा ता. १ जून रोजीं भरली होती, त्यावेळीं भागीदारांस प्रत्येक भागावर करमाफ १२५ रुपये डिव्हिडंड देण्याचें ठरलें.

**गेल्या आठवड्यांतील ट्रेझरी बिलांची विक्री**

| कोणातर्फे | रकम (रु.) | पडलेला व्याजाचा दर % |
|---|---|---|
| हिंदुस्थान सरकारः | ८२ लक्ष | १ रु. ६ आ. ५ पै |
| मध्यप्रांत व वऱ्हाड सरकारः | २० लक्ष | १ रु. ११ आ. ० पै |

**युद्ध उद्भवल्यास राजधानीचें स्थलांतर**

कराची हें शहर वैमानिक हल्ल्याचे दृष्टीनें असुरक्षित असल्याकारणानें सिंध प्रांताच्या राजधानीचें स्थलांतर हैद्राबाद येथें करण्यांत यावें, ह्या सूचनेचा उल्लेख सिंधच्या गव्हर्नरांनीं सेंट जॉन ॲम्ब्युलन्स असोसिएशनच्या गेल्या वार्षिक सभेचे वेळीं केला अशा स्थलांतराची आवश्यकता नसल्याचें त्यांनीं सांगितलें.

**जर्मनी व ग्रेट ब्रिटन ह्यांचा व्यापारी सलोखा**

ग्रेट ब्रिटन व जर्मनी ह्या दोन देशांच्या अधिकृत सरकारी प्रतिनिधींमध्यें व्यापारी कराराबाबत वाटाघाटी चालू आहेत.

**दारुबंदी व लष्करी खर्च**

"काँग्रेसच्या अधिकाराखालील प्रांतिक सरकारांस, दारुबंदीमुळें बुडणाऱ्या उत्पन्नामुळें राज्यकारभार चालविण्यास पैशाची तूट पडूं लागली तर मध्यवर्ती सरकारास लष्करी खर्च कमी करण्यास भाग पाडण्यांत येईल व पेचप्रसंग निर्माण केला जाईल" असें सरदार वल्लभभाई पटेल ह्यांनीं आपल्या एका भाषणांत नुकतेंच सांगितलें.

**पार्लमेंटच्या बोलक्या सभासदांविषयीं बोलके आकडे**

ता. १४ एप्रिल रोजीं संपलेल्या ब्रिटिश कॉमन्स सभेचे अधिवेशनांत, बोर्ड ऑफ ट्रेडचे अध्यक्ष, मि. ऑलिव्हर स्टॅन्ले, हे सर्वापेक्षां अधिक वेळ बोलले. त्यांच्या भाषणांनीं सरकारी रिपोर्टाचे १६७ रकाने व्यापले आहेत. मुख्य प्रधानांच्या भाषणास ११५ स्तंभ खर्ची पडले असून, बोलकेपणांत त्यांचा आठवा अनुक्रम लागला आहे.

**दशलक्षावा प्रेक्षक**

ग्लॅसगो येथील ब्रिटिश साम्राज्य प्रदर्शनास भेट देणारांत दशलक्षावा अनुक्रम लागण्याचा मान मिस् ड्यूक ह्या तरुणीस मिळाला. तिनें प्रदर्शनांत पाऊल टाकतांच प्रदर्शनाचे अध्यक्ष, लॉर्ड एल्जिन, हे तिला सामोरे गेले. तिचा नंतर सन्मान करण्यांत आला.

**मॅट्रिकची फी कमी होत नाहीं**

मुंबई विश्वविद्यालयाच्या मॅट्रिकचे परीक्षेस बसणाऱ्या उमेदवारास प्रत्येकी १५ रुपये फी द्यावी लागते, ती १२ रुपये करावी असा एक ठराव विश्वविद्यालयाचे सेनेटपुढें आला होता, तो नामंजूर झाला. मॅट्रिकचे परीक्षेपासून विश्वविद्यालयास निवळ ३० हजार रुपये दरसाल शिल्लक रहाते.

**चेकसची उलाढाल**

मुंबई येथील बँकर्स क्लिअरिंग हौसमधून २७-५-३८ अखेर संपलेल्या आठवड्यांत ८९,४४७ चेकसची देवघेव झाली, त्यांची एकूण किंमत १४ कोटि, ४८ लक्ष रुपये होती.

**अमेरिका आणि ग्रेटब्रिटन ह्यांमधील लोकवस्ती**

अमेरिका देशाचें क्षेत्रफळ ३७ लक्ष, ३८ हजार चौरस मैल असून त्याची लोकसंख्या १३ कोटि, ७० लक्ष आहे. म्हणजे, प्रत्येक चौरस मैलांत सरासरीनें ३६ लोक रहातात. ग्रेटब्रिटनचें क्षेत्रफळ ९५ हजार चौरस मैल व लोकवस्ति ४ कोटि, ४५ लक्ष आहे आणि प्रत्येक चौरस मैलांत सरासरीनें ४६८ लोकांची वसति आहे.

**डॉ. ग्रेगरी ह्यांचे दुय्यम मदतनीस**

हिंदुस्थान सरकारचे आर्थिक सल्लागार, डॉ. ग्रेगरी, हे लवकरच हिंदी रयतेवरील कराच्या भारासंबंधीं चौकशी करण्यास प्रारंभ करणार आहेत. त्याकरितां चार सहायकांची नेमणूक करण्यांत यावयाची आहे. ह्या चार जागांसाठी पांचशेवर अर्ज आले आहेत.

**कॅश सर्टिफिकिटांची विक्री**

गेल्या एप्रिल महिन्यांत १ कोटि, ७ लक्ष रुपये किंमतीचीं पोस्ट ऑफिस कॅश सर्टिफिकिटें खपलीं. १९३७ च्या एप्रिल महिन्यांतील विक्रीचा आकडा १ कोटि, २ लक्ष रुपये इतका होता. एप्रिल, १९३६ मध्यें १ कोटि, ४२ कोटींचीं सर्टिफिकिटें खपलीं होतीं.

**बंगलोर येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स**

बंगलोर येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सचें वार्षिक उत्पन्न सुमारें ६ लक्ष रुपये असुन खर्च ५½ लक्ष रुपये आहे. देणग्यांच्या कायम निधीच्या रकमेचें २ लक्ष, ८५ हजार रुपये इतकें व्याज येतें. हिंदुस्थान सरकार १½ लक्ष रुपये देतें व म्हैसूर दरबारची ग्रँट ३० हजार रुपये आहे. मुंबई, मद्रास व मध्यप्रांत सरकारें व त्रावणकोर संस्थान ह्या सर्वांची मिळून ग्रँट १४½ हजार रुपये भरते.

**केरळ सोप इन्स्टिट्यूट, कालिकत**

वेगवेगळ्या तेलांपासून साबण, मेणबत्त्या, व्हार्निशें, रंग, इत्यादि बनविण्याच्या धंद्यांचा पुरस्कार करण्याचे हेतूनें मद्रास सरकारनें वरील इन्स्टिट्यूटची सुमारें २० वर्षांपूर्वी स्थापना केली व तीमध्यें २ लक्ष, १५ हजार रुपये भांडवल गुंतविलें. १९१६ ते १९३६ ह्या मुदतींत इन्स्टिट्यूटनें ३८½ लक्ष रुपये किंमतीचे साबण विकले व व्याज वगैरे देऊनहि १ लक्ष, ६१ हजार रुपये निवळ नफा मिळविला. इन्स्टिट्यूटच्या पुरस्कारानें इतर अनेक कारखाने निघाले आहेत; हीच इन्स्टिट्यूटची खरी कामगिरी होय. आणखी तीन वर्षे इन्स्टिट्यूट चालू ठेवण्यास मद्रास सरकारनें नुकतीच मंजुरी दिली आहे.

**म्हैसूर संस्थानाचें बजेट**

म्हैसूर संस्थानास १९३८-३९ मध्यें ३ कोटि, ८६½ लक्ष रुपये उत्पन्न होऊन खर्च वजा जातां वर्षअखेर १,१३,००० रुपये शिल्लक उरेल अशी अपेक्षा आहे.

**मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत**

| | रुपये किंमत |
|---|---|
| २२-५-३८ ते २८-५-३८ | १८,९२,१७५ |
| २९-५-३८ ते ४-६-३८ | २९,८८,४७० |
| २१-९-३१ ते ४-६-३८ | ३,१४,८३,२२,२४५ |

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | २७० | ६ कोळसा | २७५ |
| २ सहकारी अर्बन बँका | २७१ | ७ सोन्याचा पुरवठा | २७५ |
| ३ पुणें येथील उद्योग-दिन | २७२ | ८ विमा पॉलिसी गहाण टाकूं नका ... | २७५ |
| ४ फेडरल कोर्टापुढील सुनावणी ... | २७२ | ९ न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि. ... | २७७ |
| ५ स्फुट विचार ... ... | २७३ | १० फडनवीसांची तृषाशांती | २८० |
| सोन्याचें विशिष्ट स्थान—सोनारानें कान टोचले—हिंदी लोकमताची भूमिका-लढाऊ तयारी वांचून शांतता नाहीं—वर्धा को. सेंट्रल बँक लि. | | ११ श्री. प्रधान ह्यांचा तक्ता | २८० |
| | | १२ निवडक बाजारभाव | २८१ |



# अर्थ

बुधवार, ता. ८ जून, १९३८


## हिंदी बँकिंगचे क्षेत्रांत सहकारी अर्बन बँकांचें स्थान

हिंदी बँकिंगच्या प्रगतीसंबंधानें चर्चा करतांना व्यापारी ( जॉइंट स्टॉक ) बँकांच्या शाखांचे संख्येविषयीं तुलनात्मक विचार केला जातो आणि त्यांतील वाढीवरून एकंदर प्रगतीचें अनुमान करण्यांत येतें. सहकारी बँकांचें क्षेत्र शेतकऱ्यांपुरतेंच संकुचित आहे, ह्या समजुतीनें त्यांची बँकिंगविषयींच्या आकड्यांत गणना केली जात नाहीं आणि हिंदुस्थानासारख्या शेतीप्रधान देशांत बँकिंगच्या क्षेत्रांत सहकारी बँकांस त्यांचें योग्य स्थान मिळावयास पाहिजे, तें मिळत नाहीं. सहकारी अर्बन बँकांनीं जनतेस बँकिंगची संवय लावण्याबाबत उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे, ती लक्षांत घेतली जाणें आवश्यक आहे. लहान सहान व्यापारी केंद्रांचे ठिकाणीं मोठ्या बँकांच्या शाखा चालवणें परवडत नाहीं, परंतु तेथें सहकारी अर्बन बँका स्थानिक व्यापाराच्या व उद्योगधंद्यांच्या गरजा भागवूं शकतात. सहकारी अर्बन बँकांस लोकांच्या नडी व अडचणी चांगल्या समजतात आणि त्या बँकांस मिळणारा नफा पुनः स्थानिक उपयोगाच्या कामासाठींच योजिला जातो. अशा रीतीनें सहकारी अर्बन बँकांची उपयुक्तता निर्विवाद असतांना, रिझर्व्ह बँक व्यापारी बँकांचें जाळें पसरण्याची वाट पहात आहे. तोंपर्यंत जुन्या पद्धतीनें व्यवहार करणाऱ्या सराफांशीं ती संबंध प्रस्थापित करील म्हणावें, तर ती गोष्ट तिला जड जात आहे, असें दिसतें. रिझर्व्ह बँकेनें सहकारी अर्बन बँकांकडे आरत सहानुभूतिपूर्वक पाहून त्यांच्या प्रगतीस हातभार लावला व त्यांचेमार्फत व्यापार व उद्योगधंदे ह्यांस सहाय केलें तर तिनें आपलें मध्यवर्ती बँक ह्या नात्याचें कर्तव्य बजावल्यासारखें होईल. प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटस व बँकस ह्यांच्या मध्यवर्ती संस्था गेलीं तीन वर्षे वरील आशयाची सूचना हिंदुस्थान सरकारास करीत आल्या आहेत. रिझर्व्ह बँकेच्या स्थापनेच्या कायद्यांत योग्य दुरुस्ती केल्याविना सहकारी अर्बन बँका रिझर्व्ह बँकेच्या व्यवहार क्षेत्रांत बसूं शकणार नाहींत, हें खरें आहे. परंतु, अशी दुरुस्ती करण्यास अडचण कोणती आहे?

कोल्हापूर अर्बन कोऑपरेटिव्ह बँकेचा रौप्य महोत्सव श्री. वैकुंठराय मेहता ह्यांचे अध्यक्षतेखालीं नुकताच साजरा झाला, तेव्हां त्यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत वरील प्रश्नाचा उल्लेख केला आणि रिझर्व्ह बँकेनें सहकारी अर्बन बँकांस संलग्न करून घेण्याची आवश्यकता प्रतिपादली. लहान व्यापारी गांवांत तेथील बँकिंगच्या गरजा भागविण्यास अर्बन बँकाच ज्यास्त क्षम कशा असतात, ह्याचें त्यांनीं मुद्देसूद आणि मार्मिक विवेचन केलें. अर्बन बँकांच्या कार्याचा उपयोग करून न घेतल्याबद्दल त्यांनीं हिंदुस्थान सरकारास थोडासा दोष दिला, परंतु त्याबरोबरच खुद्द अर्बन बँकांनीं आपला कारभार कसा सुधारला पाहिजे, ह्याचेंहि त्यांनीं दिग्दर्शन केलें. जॉइंट स्टॉक बँकांनीं स्वतःच्या कारभारावर अनेक बंधनें घालून घेतलेलीं आहेत, त्यांचा अर्बन बँकांनीं अंगीकार केला पाहिजे, असें ते म्हणाले. हिंदुस्थानांतील जॉइंट स्टॉक बँकांचे व्यवहार कंपनी कायद्यान्वयें चालतात. ह्या कायद्यांत नुकतीच दुरुस्ती करण्यांत आली असून बँकांवर कित्येक इष्ट असे निर्बंध घालण्यांत आले आहेत. सहकारी अर्बन बँकांसहि अशाच प्रकारचे निर्बंध लागू करण्यांत यावे, असें श्री. मेहता ह्यांनीं सुचविलें. इतर बँकांप्रमाणें अर्बन बँकांनींहि रिझर्व्ह फंड स्वतंत्रपणें गुंतवावा; शेड्यूल्ड बँकांस ज्याप्रमाणें रिझर्व्ह बँकेजवळ कांहीं किमान रकम ठेवावी लागते, त्याप्रमाणें अर्बन बँकांचेहि पैसे खेळतें रहाण्याविषयीं तरतूद व्हावी; त्यांचीं येणीं व देणीं ह्यासंबंधीं वक्तशीरपणें पत्रकें दाखल करण्याची त्यांजवर सक्ती असावी; स्थावर मिळकतीचे गहाणतारणावर अर्बन बँकांनीं किती रकम गुंतवावी, हें निश्चित करण्यांत यावें, इत्यादि त्यांनीं सूचना केल्या. सहकारी अर्बन बँका घरगहाणावर पैसे देतात परंतु त्याची परतफेड होणें कठीण जातें, अशी सर्वत्र तक्रार आहे. आपले पैसे जरूर तेव्हां परत जमा करतां आले पाहिजेत, हें लक्षांत ठेवूनच त्यांनीं कर्जें दिलीं पाहिजेत; व्याजी लावलेल्या रकमेचें तारण सहज विकून टाकतां येईल, असेंच असावें; दिलेल्या कर्जाचा विनियोग उत्पादक कार्याकडे करण्यांत येणार असल्याविषयीं बँकांनीं खात्री करून घ्यावी, इत्यादि सुरक्षित बँकिंगचीं रहस्यें त्यांनीं सांगितलीं. गहाणाचा आणि हुंडीचा व्यवहार ह्यांमधील फरक समजला म्हणजे बँकिंगच्या धंद्याचें मर्म लक्षांत आलें, हें सुप्रसिद्ध तत्व वरील सर्व विवेचनाच्या मुळाशीं आहे.

सहकारी अर्बन बँकांचें बहुसंख्य सभासद केवळ गरजू असतात आणि सहकारी वृत्तीचा त्यांचेमध्यें पूर्णपणें अभाव असतो. तथापि, सभासद होतेवेळीं त्यांस सहकार म्हणजे काय हें कळत नसलें, तरी मागाहून त्यांस तें समजावून सांगून यशस्वी सहकारी चळवळीचा पाया तयार करतां येणें अशक्य नाहीं. अर्बन बँकांच्या कार्यकर्त्यांनीं ही कामगिरी स्वीकारली पाहिजे, असें श्री. मेहता ह्यांचें आग्रहपूर्वक सांगणें आहे. जनतेस काटकसरीची संवय लागली व लोकांच्या कर्जविषयक गरजा सहकारी संस्थांमार्फत भागवल्या गेल्या, म्हणजे सहकारी चळवळीचा प्रसार व्यापक प्रमाणावर होऊं शकेल असें ते म्हणाले. अर्बन बँकांनीं आपली कार्यक्षमता वाढवून स्वतःची उपयुक्तता सिद्ध केली पाहिजे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, दुसऱ्यास दोष देण्यांत वेळ न घालवतां आपली उन्नति करण्याकडे लक्ष द्या,

असा त्यांच्या भाषणाचा आशय होता. सहकारी वृत्तीचा जनतेंत फैलाव झाला म्हणजे सर्व समाजाची आर्थिक उन्नति होण्यास वेळ लागणार नाहीं, असा विश्वास त्यांनीं प्रकट केला. श्री. वैकुंठराय मेहता ह्यांच्यासारख्या अनुभवी आणि तज्ञ सहकारी कार्यकर्त्यांचे विचार सहकारी क्षेत्रांतील लोकांस मार्गदर्शक वाटणें अगत्याचें आहे.

## पुणें येथील उद्योगदिन

पुणें येथील गोखले हॉलमध्यें ता. १ जून, १९३८ रोजीं द्वितीय उद्योगदिन साजरा करण्यांत आला. मुंबई येथील सुप्रसिद्ध व्यापारी, श्री. मोतीराम शेठ टोपीवाले, ह्यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारावें अशी झागपकर टेलरिंग कॉलेजचे श्री. कदम ह्यांनीं सूचना केली, तिला श्री. आ. रा. भट ह्यांनीं अनुमोदन दिलें. सभेंत झालेल्या भाषणांपैकीं महत्त्वाच्या भाषणांचा सारांश येथें दिला आहे.

प्रो. वा. गो. काळे म्हणाले:—

"आपल्या रोजच्या जीवनास लागणाऱ्या वस्तू स्वतः तयार करणें अगर दुसऱ्याच्या गरजा भागवून त्याचे विनिमयांत आपल्या गरजा भागविणें, ह्यास उद्योग म्हणतां येईल. समाजाची राहणी सुधारण्यासाठीं असे उद्योग पद्धतशीर, संघटित आणि कार्यक्षम रीतीनें होणें आवश्यक आहे. मुळींच काम न मिळणें अगर चरितार्थास पुरेल इतकें काम न मिळणें, हे दोनहि बेकारीचेच प्रकार आहेत. नैसर्गिक परिस्थितीचा पुरेपूर फायदा करून घेऊन व प्रतिकूल परिस्थितीस तोंड देऊन आपण व्यापार व उद्योगधंदे चालविले पाहिजेत आणि मालाची विक्री वाढवून आणली पाहिजे. आजच्या परिस्थितीची जाणीव करून घेऊन आणि आवश्यक तें व्यवहार शिक्षण घेऊन संघटनेनें आपण पाऊल टाकलें पाहिजे. राजकीय सत्ता आणि व्यापारविषयक प्रगति ह्यांचा परस्पर संबंध चीन आणि ॲबिसिनिया ह्यांवरील आक्रमणांनीं स्पष्ट केला आहे. आपलें स्वतःचें भांडवल, कौशल्य, घटनात्मक प्रयत्न व परस्पर विश्वास ह्यांच्या अस्तित्वावर प्रगति अवलंबून आहे. सरकार आपलें स्वतःचें असलें म्हणजे उद्योगधंद्यांस संरक्षण मिळूं शकतें. त्या दिशेनेंहि यत्न सारखा होणें जरूर आहे. महाराष्ट्रांत व्यापारी वृत्तीचा अभाव आहे व औद्योगिक परंपरा नाहीं, हें खरें; तथापि आम्हीं आतां पायंडा पाडला पाहिजे. मुंबईसारख्या शेजारच्या औद्योगिक केंद्रांत इतर प्रांतांतील लोकांची गर्दी उडते पण महाराष्ट्रीयांची मात्र पीछेहाट होते, ती ध्यानीं आणून थांबविणें आवश्यक व शक्य आहे. मागील पिढीस ह्या प्रश्नाचा विचार करावा लागला नाहीं आणि तिनें तो केला नाहीं; तथापि पालकवर्गानें व पुढाऱ्यांनीं सध्याची बिकट परिस्थिति समजून घेतली पाहिजे. गेल्या ५-१० वर्षांत थोडीफार जागृति झाली आहे, परंतु पाऊल ह्यापेक्षां अधिक निश्चयानें व झपाट्यानें पुढें पडलें पाहिजे. तरुणांचें ह्या बाबतींतलें कर्तव्य स्पष्ट आहे, परंतु पालक आणि एकंदर समाज ह्यांची औद्योगिक उदासीनता नाहींशी होणें आवश्यक आहे. ह्या स्वकर्तव्याची आठवण व्हावी आणि आपल्या प्रत्येकाचे हातून तें घडावें म्हणून औद्योगिक दिन साजरा करावयाचा आहे."

श्री. ल. ब. भोपटकर ह्यांनीं आपल्या भाषणांत, हिंदुस्थान उद्योगधंद्यांचे बाबतींत किती मागसलेला आहे ह्याचें वर्णन केलें आणि धाडस असल्याखेरीज व्यापारांत यश मिळणार नाहीं असें सांगितलें. श्री. जानकीबाई भट ह्यांनीं उद्योगप्रियता वाढण्याचे आवश्यकतेवर भर दिला. प्रो. जी. एन्. मराठे ह्यांनीं, तात्त्विक शिक्षणास व्यवहारप्रधान शिक्षणाची भरीव जोड पाहिजे आणि महाराष्ट्रांत व्यापारी कॉलेजांपेक्षा लहानमहान व्यापारी शाळांचीच जास्त जरूर आहे असें प्रतिपादन केलें.

सभेचे अध्यक्ष, श्री. मोतीराम शेठ टोपीवाले, हे आपल्या भाषणांत म्हणाले:—

"आपण एकीकडे दरिद्री होत चाललों असतां चैनी बनूं लागलों आहों व आहे त्या पैशाचा उपयोग कार्यक्षमता वाढविण्याकडे न करतां आळस वाढविण्याकडे करीत आहों. महाराष्ट्रीयांत धडाडीचा अभाव आहे, त्याचप्रमाणें परस्पर विश्वासहि आपणांत नाहीं. भागीदारांचें एकमेकांशीं कधीं पटत नाहीं, ही स्थिति इष्ट नाहीं. आपल्या अनवश्यक गरजा कमी करून संघटनेनें व्यापारधंदा केला, तर महाराष्ट्रीयांस यश मिळालेंच पाहिजे."

## मध्यवर्ती आणि प्रांतिक सरकार ह्यांमधील अधिकारक्षेत्राची वांटणी: फेडरल कोर्टापुढील सुनावणी

मध्यप्रांत व वऱ्हाडच्या कायदेमंडळानें त्या प्रांतांतील पेट्रोल आणि मोटारींचीं तेलें ह्यांच्या किरकोळ विक्रीवर कर बसविला आहे. रुपयाच्या किंमतीच्या पांच टक्क्यांइतका कर प्रांतिक सरकारास मिळावयाचा आहे. ही कराची बाब १९३५ च्या गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्टाप्रमाणें मध्यवर्ती कायदेमंडळाचे कक्षेंतील आहे, असें हिंदुस्थान सरकारचें म्हणणें आहे. मध्यवर्ती सरकार व प्रांतिक सरकार ह्यांचेमधील वांध्यांचा निकाल नवीन निर्माण झालेल्या फेडरल कोर्टानें ठरवावयाचा असल्याकारणानें गव्हर्नर जनरलनें सदरहु कोर्टाकडे ह्या प्रश्नाचा निकाल सोंपविला आहे. फेडरल कोर्टाची बैठक ता. १ जून रोजीं भरली, त्यावेळीं ह्या प्रश्नाबाबत कोणाकोणावर नोटिस बजवावयाची हें ठरलें. आज हा प्रश्न एका प्रांतापुरताच असला, तरी त्याच्या निकालावर इतर प्रांतांचें धोरणहि अवलंबून राहील व त्यांसहि वरील कर बसविण्यास मोकळीक आहे किंवा नाहीं हें समजेल, ह्या दृष्टीनें इतर सर्व प्रांतांवरहि नोटीस बजवावयाची किंवा कसें, ह्या विषयीं फेडरल ॲडव्होकेट जनरल ह्यांनीं खुलासा विचारून घेतला. हिंदुस्थान सरकार व मध्यप्रांत सरकार ह्यांवर नोटीस बजवावी व १ जुलै रोजीं त्यांस कायदेशीर प्रतिनिधीमार्फत हजर रहाण्यास सांगावें, असा कोर्टानें हुकूम दिला. ह्या हुकुमाची प्रत प्रांतिक ॲडव्होकेट जनरलांकडेहि माहितीकरतां पाठवावी असें ठरलें.


## मराठी केन्द्र संस्था, पुणें

उन्हाळ्यानंतर १५ जून रोजीं सुरू होईल. यंदापासून मॅट्रिक नापास आणि नोकरी करूं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांकरितां बँकिंग आणि अकौंटन्सी या विषयांचे डिप्लोमा अभ्यासक्रम सुरू केले आहेत. शिक्षक वर्ग पदवीधर व अनुभवी असा असून परगांवचे विद्यार्थ्यांना वसतिगृहाची सुंदर सोय केली आहे. जास्त माहिती करितां माहितीपत्रक मागवा.

आचार्य,

मराठी केन्द्र संस्था.

२९२ सदाशिव पेठ, पुणें.

# स्फुट विचार

### सोन्याचें विशिष्ट स्थान

हिंदुस्थानांतून आज गेल्या सात वर्षांत सुमारें ३१५ कोटि रुपयांचें सोनें बाहेर गेलें आहे. ही निर्गत दुःस्थितीचें निदर्शक असून सोन्याचा संचय देशामध्यें पुरेसा असला पाहिजे असें प्रतिपादणाऱ्या लोकांस अडाण्यांच्या वर्गांत लोटण्याची कित्येक लेखकांची प्रवृत्ति दिसून येते. सोन्यास त्या रीतीनें महत्त्व देणें वेडेपणाचें आहे आणि कागदी चलनाचा आधार म्हणूनहि त्याचें स्तोम माजवतां कामा नये असें त्यांचें म्हणणें आहे.तात्त्विक दृष्टीनें पाहतां त्या टीकेमध्यें पुष्कळ तथ्यांश आहे, ह्यांत शंका नाहीं. सोनें हा एक प्रकारचा माल आहे; तो एक धातु आहे आणि त्याचें कार्य दुसऱ्या मालानें होण्यासारखें असतां त्यास अवास्तव रीतीनें भलत्या मापानें मोजणें चुकीचें आहे असें म्हणतां येईल. तथापि, कोणत्याहि वस्तूस मोल येतें तें तिच्यामध्यें नैसर्गिक किंवा लोकांनीं केवळ कल्पिलेले असे विशिष्ट गुण असतात, म्हणून येतें. सोन्यांत असे नैसर्गिक गुण इतर धातूंच्या मानानें विशेष आहेतच.परंतु त्या विषयींची मानवी लालसा विलक्षण आहे. सोनें मनुष्याची विशिष्ट रीतीची ही गरज भागवतें आणि त्या कारणानें त्यास किंमत येते. "नास्ति ततः सुखलेशः सत्यम्" असें तत्त्ववेत्त्यांनीं सांगितलें किंवा "तो लोखंड--पितळेसारखा एक केवळ धातू आहे" असें भौतिक शास्त्रज्ञांनीं म्हटलें तरी सोन्यास असलेली लौकिक मागणी नाहींशी किंवा कमी होत नाहीं. त्याचमुळें कागदी चलनास सोन्याइतका भरभक्कम आधार पाश्चात्य राष्ट्रांसहि दुसरा सांपडत नाहीं. राष्ट्रांच्या चलनपद्धतींत आजहि सोन्यास जें महत्त्वाचें स्थान आहे, त्याच्या मुळाशीं त्या धातूची लोकांस असलेली विलक्षण आवड हेंच कारण आहे. हिंदी लोकच तेवढे खुळे सोन्याचे भक्त आहेत असें नसून हा प्रकार जगांतील सर्व राष्ट्रांत आहे.

---

### सोनारानें कान टोचले !

मिडलंड बँक ह्या प्रसिद्ध ब्रिटिश बँकिंग संस्थेच्या मिडलंड बँक रिव्ह्यू नामक नियतकालिकांत "सोन्याचें आधुनिक आर्थिक घटनेंतील स्थान" ह्या विषयावर एक लेख अलीकडे आला असून त्याचा त्रोटक गोषवारा प्रसिद्ध झाला आहे. सोन्याविषयींची सामान्य जनतेची कल्पना आणि त्यास असलेली लोकांची मागणी ह्यासंबंधानें विधानें आम्हीं वर केलीं आहेत, त्यांस एका नामांकित ब्रिटिश बँकेच्या विद्यमानें प्रसिद्ध होणाऱ्या नियतकालिकांत पाठिंबा मिळत आहे, हें लक्षांत घेण्यासारखें आहे. मोठ्या मोलाची वस्तू ह्या नात्यानें सोन्यास समाजांत हजारों वर्षें जें स्थान मिळालें आहे, तें कागदाचीं चलनें सर्रास चालू असूनहि आधुनिक काळांत स्थिर आहे ह्या गोष्टीकडे त्यांतील लेखकानें लक्ष वेधलें आहे. दुसऱ्या कोणत्याहि पदार्थाच्या मोलावर नाहीं इतका विश्वास आजहि जनता सर्व जगभर सोन्यावर ठेवीत आहे. पाहिजे तेव्हां सोन्याच्या मोबदल्यांत आपणांस वाटेल त्या देशाचें चलन मिळूं शकतें अशी शाश्वती लोकांस वाटते, हा त्याचा विशेष प्रकारचा गुण आहे. राष्ट्रीय सरकारें आणि मध्यवर्ती बँका ह्यांनीं सोन्याचे संचय करून ठेवले आहेत, ह्याचेंहि कारण, त्यांस केव्हांहि गिऱ्हाइक मिळूं शकेल आणि त्यांच्या विनिमयाचें योग्य मोल आपल्या पदरीं पडेल हा त्यांचा विश्वास होय. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे "अनायासें योग्य किंमतीस विकतां येण्याजोगी वस्तू" हें सोन्याचें वर्णन वर उल्लेखिलेल्या लेखांत करण्यांत आलें आहे, तें अर्थपूर्ण आहे. नडीच्या प्रसंगीं उपयोगी पडणारा जिन्नस ह्या कल्पनेनेंच हिंदी लोक सोन्यास महत्त्व देत आले आहेत.हिंदी राष्ट्रास आजहि त्याविषयीं उत्कंठा लागते ह्याचें मर्महि त्यांतच आहे.

---

### हिंदी लोकमताची भूमिका

आपली बचत सोन्यांत अडकवून न टाकतां तिचा उत्पादक रीतीनें जनतेनें उपयोग केला पाहिजे आणि विशेषतः हिंदुस्थानांत अशा प्रकारच्या व्यवहारांची व बँकिंगच्या विस्ताराची अत्यंत आवश्यकता आहे, ह्यांत शंका नाहीं. दागदागिन्यांत पैसा घालण्याऐवजी स्वतःच्या आणि राष्ट्राच्या हितासाठी तो अर्थोत्पादक रीतीनें लोकांनीं वापरण्यावर राष्ट्रीय उन्नति बहुतांशीं अवलंबून आहे, हें विसरून चालावयाचें नाहीं. तथापि, राष्ट्रीय चलन, हुंडणावळ आणि व्यापार ह्यांच्या स्थिरतेस सोन्याचा आधार किती सहायक होत असतो हें येथें दाखवावयाचें असून त्या संबंधांत व्यवहारी लोकांच्या अनुभवसिद्ध आधुनिक कल्पना काय आहेत हें निदर्शनास आणावयाचें आहे. हिंदुस्थानांतून सोन्याची अव्याहत निर्गत होत आहे, तिच्या बाबतींत होणारी प्रतिकूल टीका अज्ञानमूलक नसून तिच्यामध्यें भरीव तथ्य आहे. आधुनिक संघटनेंतहि राष्ट्रीय जीवनाच्या रक्षणास सुवर्णसंचय आवश्यक असल्याचा पुरावा पाश्चात्य देशांच्या चलनविषयक धोरणावरून मिळत आहे. अशा स्थितींत हिंदी लोकांनीं आपल्या देशांतील सोन्याविषयीं ह्याच धोरणाचा पुरस्कार केला असतां त्यांत काय वावगें आहे ? सोन्याच्या आधारावांचूनहि कागदी चलनें व्यवहारांत खेळूं शकतील असें कांहीं विद्वानांचें म्हणणें असून त्यांनीं त्या प्रकारच्या चलनव्यवस्था सुचवल्याहि आहेत. परंतु हा मुख्यत्वेंकरून मानवी भावनेचा आणि व्यवहाराचा प्रश्न आहे. सुवर्णरहित चलनव्यवस्थेचा राष्ट्रांस आलेला अनुभव उत्तेजनकारक नाहीं; तो अत्यंत कटु आहे. तसेंच, राष्ट्रसंरक्षणासाठी सुवर्णसंचय आवश्यक असल्याविषयीं पाश्चात्य देशांमध्यें लोकांची खात्री झाली आहे. ह्या सर्व परिस्थितीस हिंदुस्थान देश अपवाद असावा अशी अपेक्षा कोणीहि कां करावी ?

---

### लढाऊ तयारीवांचून शांतता नाहीं

"जगांत युद्ध नको असेल आणि आंतरराष्ट्रीय शांतता टिकावयास हवी असेल तर युद्धाची सिद्धता ठेवली पाहिजे" हा जुना राजकारणांतला सिद्धांत आजहि पूर्णपणानें प्रभावी आहे असें स्पष्ट दिसतें. एका राष्ट्रानें स्वसंरक्षणार्थ किंवा चढाईप्रीत्यर्थ लढाऊ तयारी केली कीं दुसरीं राष्ट्रें तेंच करूं लागतात आणि ह्यांत आंतरराष्ट्रीय युद्धास अनुकूल अशी भूमिका तयार होते असा त्या सिद्धांताच्या विरुद्ध घेतला जाणारा आक्षेप व्यर्थ ठरला आहे. अलीकडे लहान आणि असमर्थ देशांशीं युद्ध करून त्यांचें स्वातंत्र्य हरण करण्याचा घडाका कांहीं दांडग्या राष्ट्रांनीं बेमुर्वतपणानें चालवल्याकारणानें लढाई करण्याची इच्छा नसणाऱ्या देशांसहि स्वरक्षणासाठी स्वतःचें लढाऊ बळ वाढवावें लागत आहे. तुर्कस्ताननें पंचवीस कोटि रुपये ह्या कामीं खर्च करण्याचें ठरवल्याविषयींची बातमी नुकतीच प्रसिद्ध झाली आहे. ह्या तयारीचें कारण वर नमूद केलेल्या सिद्धांतांत सांपडतें. बेसावध व्यक्ती किंवा राष्ट्रें आंतरराष्ट्रीय

संबंधाच्या नीतीचे नियम शब्दावर वसवणाऱ्या देशांच्या हद्दयास वठी पटतात, ह्या ताज्या अनुभवावरून लोक शहाणे झाले आहेत. ब्रिटिश मुत्सद्दी जणूं काय उद्यां युद्ध झाल्यास प्रतिकाराची सिद्धता आज जय्यत पाहिजे ह्या धोरणानें स्वराष्ट्र-संरक्षणाच्या सर्विक योजना अंमलांत आणीत आहेत. त्यांनीं शस्त्रास्त्रांचीच सिद्धता चालवली आहे असें नसून युद्धाच्या नौदास उपयोगी पडावी म्हणून धान्यधुन्यासारखी अन्नसामुग्रीहि ते साठवून ठेवीत आहेत. गहूं, साखर व व्हेल तेल ब्रिटिश सरकारनें खरेदी केलें असून कच्च्या मालाच्या पुरवठ्याबाबत अशीच तजवीज झाली आहे असें लॉर्ड झेटलंड ह्यांनीं नुकतेंच लॉर्डांच्या सभेंत सांगितलें. मागील अनुभवाच्या दृष्टीनें सरकारनें सर्व तयारी ठेवली आहे. लढाऊ व संरक्षक योजनांचें यंत्र सिद्ध आहे. एक बटन दाबला कीं तें चालू होईल असें त्यांनीं आश्वासन दिलें. शक्तिहीनाच्या शब्दास किंमत नसते व बलवंताशीं जपून वागावें लागतें हा अनुभव अलीकडच्या आंतरराष्ट्रीय राजकारणांत येत आहे. झेकोस्लोव्हाकियामधील धामधुमीच्या प्रकरणांतहि हीच परिस्थिति निदर्शनास आली आहे. शांततामय मार्गानें आणि तडजोडीनें आंतरराष्ट्रीय वाद मिटण्याची आशा फोल ठरून लढाऊ शक्तीचाच उपयोग ह्या कामीं अपरिहार्य झाला आहे. लोकांच्या आर्थिक प्रगतीच्या मार्गांत हें भयंकर विघ्न आहे.

---


### वर्धा को. सेंट्रल बँक लि., वर्धा.

( ता. १–७–३६ ते ३०–६–३७ अखेरचा अहवाल )

वरील बँकेचा पंचविसावा वार्षिक अहवाल आमचेकडे आला आहे. अहवालाचे वर्षअखेर या जिल्ह्यांतील ५ पतपेढ्या कमी होऊन त्यांची संख्या ५९ राहिली. पतपेढ्यांनीं आपल्या सभासदांविरुद्ध मिळविलेल्या अवॉर्डांची संख्या १६१ होती व त्यांचेकडे बँकेचें ४५,८२० रुपये येणें होतें. २० पतपेढ्या लिक्विडेशनमध्यें होत्या. पतपेढ्यांकडून एकूण येणें २ लक्ष ११ हजार रुपये असून कर्जापैकीं चांगलें समजलेलें कर्ज १ लक्ष, ४४ हजार रुपये आहे. अहवालाचे वर्षी २ लक्ष, ५७ हजार रुपये वसूल व्हावयास पाहिजे होते, त्यापैकीं ४४ हजार रुपये नगदी वसूल झाले. बँकेचें भाग भांडवल ५१, ८२० रुपयांचें असून तिचे जवळील ठेवी २ लक्ष, २८ हजार रुपयांच्या आहेत. बचत फंडांत २७ हजार रुपये, बाईट व संशययुक्त तरतुदीचे फंडांत ३९ हजार रुपये व इतर फंडांत २५½ हजार रुपये आहेत, त्यापैकीं इमारत फंडाचे १६ हजार रुपये आहेत. "या जिल्ह्यांतील सहकारी चळवळ खालावत आहे. तिला जोमदार करण्याकरितां फार झटावें लागेल व नवीन पेढ्या स्थापन कराव्या लागतील, त्या कामाकरितां एक स्वतंत्र मनुष्य नेमण्याची जरूर आहे" असा बँकेच्या रिपोर्टांत शेरा आहे. हिंगणघाट, वर्धा व आर्वी तहसिलीकरितां कर्ज लवादमंडळें काम करीत आहेत. शेतकऱ्यांच्या खालावलेल्या आर्थिक परिस्थितीचा जिल्हा मध्यवर्ती बँकेवर प्रतिकूल परिणाम होणें अपरिहार्य असतें. ह्याकरितां, बँकेस शक्य तेवढी कमी झळ लागावी अशी व्यवस्था वेळींच करणें इष्ट असतें. परिस्थिति थोडी फार निवळतांच वर्धा सें. को. बँक आपली मजबुती वाढविण्यास समर्थ होईल, असें मानण्यास जागा आहे. ३०-६-३७ रोजीं रजिस्ट्रारनीं मंजूर केलेल्या हिशेबानुसार बँकेस वाटतां येण्याजोगा १७, ७९२ रुपये नफा झालेला आढळतो.


# किर्लोस्कर

**२५ फुटांहून खोल विहिरीसाठी किर्लोस्कर हुगळी पंपाची कामगिरी लोकांना फारच पसंत पडली आहे.**



कारखान्याचे प्रतिनिधी आपल्यास भेटतील, त्यांना आपली गरज कळवा. म्हणजे आपल्या उपयोगी पडेल अशा किर्लोस्कर पंपाची निवड ते करून देतील किंवा थेट कारखान्यास लिहा. म्हणजे सविस्तर माहिती दिली जाईल.

## हुगळी पंप

किर्लोस्कर हात व पावर पंपांचा सचित्र कॅटलॉग मागवा

**किर्लोस्कर बंधु, लि. : किर्लोस्करवाडी, सातारा**

### दगडी कोळसा

दगडी कोळशाच्या उत्पादनाचे दृष्टीनें अमेरिका, ग्रेट ब्रिटन व जर्मनी असा अनुक्रम लागतो. १९ व्या शतकाचे पूर्वार्धांत ह्या बाबतींत ग्रेटब्रिटन अग्रगण्य होता, परंतु अमेरिका आतां आघाडीवर आला आहे. कोळशाच्या उत्पादनाविषयीं तुलनात्मक आकडे येथें दिले आहेत:---

कोळशाचें उत्पादन
(कोटि टन)

| वर्ष | ग्रेट ब्रिटन | अमेरिका | जर्मनी |
|---|---|---|---|
| १८६० | ८ | १·३ | १·२ |
| १८९० | १८·२ | १४·१ | ६·९ |
| १९०० | २२·५ | २४·१ | १०·७ |
| १९१३ | २८·७ | ५०·९ | १८·७ |
| १९२५ | २४·३ | ५२·० | १४·३ |
| १९३७ | २४·१ | ४३·६ | १८·१ |

(ह्या पुढील जर्मनीमधील उत्पादनाचे आकड्यांत ऑस्ट्रियांतील उत्पादनाचाहि समावेश होईल.)

ग्रेट ब्रिटनमधील खाणींची संख्या सुमारें २ हजार आहे. त्यांतून दरसाल निघणाऱ्या कोळशापैकी चवथा हिस्सा कोळसा परदेशांत खपतो अगर आंतरराष्ट्रीय व्यापारांत गुंतलेल्या बोटींवर जळण म्हणून वापरला जातो. उरलेल्या कोळशांतील १० टक्के भागाचा गॅस करण्याकडे उपयोग होतो, ८ टक्क्यांपासून वीज निर्माण करण्यांत येते, ७ टक्के भाग इंजनांत जळतो व ७ टक्के भाग कोळसा खुद्द खाणींतील इंजनांतच खपतो. तेवढ्याच वजनाच्या कोळशापासून अधिक शक्ति निर्माण करणें आतां कार्यक्षम यंत्रसामुग्रीचे द्वारा शक्य झालें आहे, ह्यामुळें कमी कोळशांत ज्यास्त कार्यभाग होतो.

---

### सोन्याचा पुरवठा अजून वाढतच आहे!

जगांतील राष्ट्रांच्या व्यापारी गरजा भागवण्यास आवश्यक असलेलें सोनें खाणींतून न निघाल्यामुळें सोन्याचा तुटवडा पडून त्याच्या आधारावर काढण्यांत येणाऱ्या चलनांचा पुरवठा मर्यादित होईल अशी भीति कांहीं वर्षांमागें व्यक्त करण्यांत येत असे. तिचा निरास अलीकडच्या अनुभवानें पूर्णपणानें केला आहे. सोन्याचें उत्पादन करणाऱ्या देशांत रशियानें महत्वाचें स्थान मिळविलें आहे. तो देश वगळला तरीहि सोन्याचें, जागतिक उत्पादन गेल्या वर्षीं १९३६ सालाचे मानानें ७ टक्क्यांनीं अधिक झालें. दक्षिण आफ्रिकेखेरीज इतर सर्व देशांतल्या खाणींत हा वाढावा दिसून आला. जगांतील राष्ट्रांच्या सर्व गंगाजळ्यांची बेरीज केली असतां असें दिसतें कीं तिची किंमत १९२९ सालाचे मानानें अडीच पट होती. १९३७ मध्यें मध्यवर्ती बँकांनीं आपल्या निधींसाठी सोनें खरेदी केलें त्याची किंमत १९२९ मधील किंमतीपेक्षा ७० टक्के अधिक होती. सबंद जगांतील (रशिया व स्पेन वगळून) चलन निधींतल्या सोन्यापैकी ८७ टक्के इतकें सोनें अमेरिका, फ्रान्स, इंग्लंड, बेल्जम, नेदरलंड्स व स्वित्सर्लंड ह्या सहा देशांच्या गंगाजळ्यांत आहे. ह्यावरून इतर देशांतील सोन्याचा संचय किती अल्प आहे ह्याची कल्पना येईल. बाहेरून येणाऱ्या सोन्याचा अनिष्ट परिणाम राष्ट्रीय चलनावर होऊं नये म्हणून इंग्लंडसारख्या देशांत कोट्यवधि रुपयांचें सोनें "स्वची" करून डांबून टाकलें आहे.

---

'यश आलेंच पाहिजे.
मग महाराष्ट्रीय कसले ?'
अशा स्वाभिमानी महाराष्ट्रीयांच्या आर्थिक साहाय्यानें सर्व मशिनरी आली, उभारणीला सुरुवात झाली, ५०० एकर उसाची लागवड करतां आली.
तारीख १० जानेवारी १९३९च्या
मकर-संक्रमणाला
बृहन्महाराष्ट्रीय साखर
व
१२५० एकर उंसाची नवी लागवड
यशाला मदत व दरसाल ५॥ टक्के व्याज व दोन वर्षांनीं रक्कम परत. डिपॉझिट रकमा घेण्यास बोर्डानें मंजूरी दिली आहे.
रा. ब. काकासाहेब सहस्रबुद्धे, डॉक्टर रा. ह. भडकमकर, M.A., M.D. रा. ब. वि. कृ. मुळये इंदोर, रा. ब. रावजी जनार्दन भिडे यांच्या अभिप्रायांसह सविस्तर माहिती खालील पत्त्यावर मिळेल.
दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें.
२५७ बुधवार पेठ, पुणें २, बेलबागेसमोर.

स्त्रियांचा आजार
म्हणजे मुख्यत: विटाळदोष आणि गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स (आर्तवदोषारि) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे पाठावरून तयार केलेलें असून ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटीपोटांत कळा मारणें, अकालीं गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें इत्यादि विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत. गुणांमध्यें याची बरोबरी बाजारांतील इतर औषधें करूं शकत नाहींत. किंमत, बाटलीस रु. ३. ट. ख. १२ आणे निराळा. एकदम तीन बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह ९ रु.
हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठी मुख्य विक्रेते:—
धी इंडो फॉरिन एजन्सीज. (डिपार्टमेंट नं. ६)
२५३/३ माधव विलास टिळकवाडी पुणें २.

### एकाच्या निष्काळजीपणामुळें दुसऱ्याचें नुकसानः कायदा सुधारण्याची आवश्यकता

